सदा अग्रेसर साप्ताहिक
# चित्रलेखा
२१ मार्च २०११ | १० रु.



*कॉस्मॅटिक ट्रीटमेंट*मध्ये *इना सर्जरी* केली जाते. ही *सर्जरी* कोणतीही चिरफाड न करता केवळ इंजेक्शन टोचून केली जाते. याशिवाय चेहऱ्याच्या सौंदर्यात बाधा आणणारे अवयव उदाहरणार्थ, मोठ्या चेहऱ्याला सूट न होणारं छोटं नाक, छोटे ओठ, हनुवटी यांना चेहऱ्याला साजेसे होतील अशा तऱ्हेने लहान-मोठे केले जातात. त्यामुळे चेहरा अतिशय आकर्षक दिसतो.'

तरुण-तरुणी भावनेच्या भरात एकमेकांवर मनापासून प्रेम करतात. प्रेम करणारे सर्वच काही सुंदर नसतात. पण तरीही त्यांचं प्रेम जमतं. या प्रेमिकांपैकी कुणाचं नाक बसकं असतं, तर ओठ जाडसर असतात. त्यामुळे सौंदर्यात बाधा येते. अर्थात, खऱ्या प्रेमात सौंदर्याच्या उणिवेचा अडथळा येता कामा नये. पण *ती* किंवा *तो* कधीकधी रागाच्या भरात या उणिवा एकमेकांना सुनावतात. मग तिचा किंवा त्याचा *मूड* जातो. आपल्यातल्या त्या उणिवांचाच मग ते सारखा विचार करत बसतात. त्यांना त्यांचं *टेन्शन* येतं. पण आता प्रेमाच्या आड येणारी शारीरिक व्यंगाची ही अडचण दूर करता येणार आहे.

या चिकित्सेबाबत *चित्रलेखा*शी बोलताना डॉक्टर मोहन थॉमस म्हणाले, 'कुणाचं अशा व्यंगांमुळे लग्न जुळत नसतं, तर कुणाला लग्न



**केस या विषयावर पी.एचडी. करणाऱ्या रोहिणी काचोळे: अकाली येणारं वृद्धत्व हा केमिकलचा वापर आणि बदललेल्या लाइफस्टाइलचा परिणाम आहे.**

समारंभ किंवा इतर कार्यक्रमात आपण इतरांसारखे मोहक नाहीत, ह्याची टोचणी अस्वस्थ करत राहाते. असे अनेक *यंग, मिडल एज,* तसेच ५०-५५ वर्षे वय असलेले स्त्री-पुरुषही आमच्याकडे सल्ल्यासाठी येतात. अनेकांना आपल्या खास प्रेमी व्यक्तीमधील सौंदर्याची उणीव भरून काढायची असते. तसेच असं अनोखं *गिफ्ट* त्यांना त्यांच्या आवडत्या व्यक्तीला आयुष्यातील कायमची आठवण म्हणून द्यायचं असतं.'

वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अशी *ट्रीटमेंट* घेता येते. मुख्यतः तरुणांमध्ये मुरुमांची समस्या, नाक-ओठांची समस्या, तसंच मुरुमांमुळे गालांवर पडलेल्या खड्ड्यांची समस्या उद्‌भवत असते. त्यामुळे त्यांचा चेहरा कितीही आकर्षक असला, तरी या व्यंगामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. एखाद्या *इंटरव्ह्यू*ला जायचं म्हटलं, तरी प्रथमदर्शनी चेहराच पाहिला जातो. तसंच *एअर हॉस्टेस, मॉडेलिंग, फिल्म करियर* यासाठी तर चेहराच महत्त्वाचा ठरतो. डॉ. मोहन थॉमस म्हणतात, 'सध्या चेहऱ्याला अतिशय महत्त्व आलेलं आहे. पूर्वी भावनिक प्रेम असायचं. चेहऱ्यापेक्षा भावनेला महत्त्व दिलं जायचं. पण आता *टीव्ही*वर-सिनेमांत इतक्या देखण्या तरुण-तरुणी दाखवल्या जातात की, *आपलाही प्रियकर सलमान खान, आमीर खानसारखा दिसायला हवा,* असं तरुणींना वाटतं. तर ऐश्वर्या रॉय आणि कॅटरिना कैफचं सौंदर्य युवा पिढीतील तरुणांच्या मनात ठसलेलं असतं. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यातील उणीव दूर करण्यासाठी *कॉस्मॅटिक ट्रीटमेंट* अतिशय महत्त्वाची ठरते.'

आकर्षक ओठ हे स्त्रियांच्या सौंदर्याचं एक महत्त्वपूर्ण अंग असल्याने अनेक स्त्रिया आपले ओठ भरीव व सुंदर आकाराचे असावेत यासाठी विविध प्रकारच्या सौंदर्यप्रसाधनांचा अवलंब करीत असतात. *कॉस्मॅटिक ट्रीटमेंट*मध्ये सातत्याने झालेल्या नवनव्या संशोधनांमुळे *कॉस्मॅटिक ट्रीटमेंट* आता अधिक प्रभावी आणि सुरक्षित झाली असून स्त्रिया या *ट्रीटमेंट*ला अधिक पसंती देत आहेत. यासंबंधी अधिक माहिती देताना कॉस्मॅटॉलॉजिस्ट डॉ.रश्मी शेट्टी म्हणाल्या, 'हल्ली प्रत्येक मुलीला आपले ओठ कॅटरिना कैफ व बिपाशा बासूसारखे *हॉट* असावेत, असं वाटतं. म्हणूनच आमच्या *क्लिनिक*मध्ये स्वतःचे ओठ *जुवेडर्म*च्या सहाय्याने आकर्षक करून घेण्यासाठी अनेक तरुणी येत आहेत. मोठे आणि सुंदर भरीव ओठ हे नेहमीच तारुण्याचं प्रतीक मानले जातात. असे *हॉट* ओठ मिरवायला फक्त तरुण मुलींनाच आवडतं असं नाही, तर वय वाढत चाललेल्या स्त्रियांनाही भरीव, *हॉट* ओठांचा मोह आवरता येत नाही. मध्यमवयीन स्त्रियाही आमच्या *क्लिनिक*मध्ये येऊन ही *हॉट* ओठांची *ट्रीटमेंट* करवून घेत आहेत.'

*जुवेडर्म व्हॉल्यूम*सारख्या नैसर्गिक साखरेच्या कणांपासून बनवलेल्या अत्यंत प्रभावी *डर्मल फिलर*मुळे (त्वचेत भरता येण्याजोगा पदार्थ) ओठ सुंदर करता येतात.

ओठांसाठी अशा प्रकारच्या दोन उपचार पद्धती आहेत. त्यातली एक, उपचारपद्धती *डर्मल फिलर्स!* या उपचारासाठी २० ते २५ हजार रुपये खर्च येतो. पण याचा परिणाम वर्षभर टिकतो. ओठांवरची दुसरी उपचारपद्धती म्हणजे *पाऊट सर्जरी.* या *सर्जरी*त ओठांचा आकार कायमस्वरूपी तसाच राहातो. यासाठी साठ ते सत्तर हजार रुपये खर्च येतो.

पूर्वी चेहरा सुंदर दिसण्यासाठी केवळ पावडर किंवा *फेशियल क्रीम* यांचा वापर केला जायचा. पावडर आणि *फेशियल क्रीम*ने चेहरा फक्त थोडा उजळ होतो. पण वाकडं असलेलं नाक सरळ होत नाही किंवा छोटे ओठ मोठे आणि टवटवीत दिसत नाहीत. चेहऱ्यातील ही उणीव भरून काढण्यासाठी *प्लास्टिक सर्जरी* हा एक उपाय आहे. जन्मतःच मधून फाटलेले ओठ *प्लास्टिक सर्जरी*ने जोडता येतात. तसंच भाजलेला चेहरा, फेपटं नाकही *प्लास्टिक सर्जरी*ने नीट करता येतं. पण त्यासाठी भरपूर कालावधी लागतो. तसंच प्लास्टिक सर्जरी केलेला भाग एखाद्या आघाताने फाटला तर तो पुन्हा जोडता येत नाही. पण कॉस्मॅटिक सर्जरीत तसं नसतं. याविषयी अधिक माहिती देताना डॉ.मोहन थॉमस म्हणाले, *'कॉस्मॅटिक ट्रीटमेंट*-साठी कोणतीही *सर्जरी* करावी लागत नाही. त्वचेला *ग्लो* आणण्यासाठी *डर्मल फिलर ट्रीटमेंट* केली जाते. इंजेक्शनद्वारे एक प्रकारचं *केमिकल* त्वचेत सोडलं जातं. हे *केमिकल* महागडं आहे. त्यामुळे या *ट्रीटमेंट* थोड्या महागड्या आहेत. या *ट्रीटमेंट*साठी आठ ते दहा हजार रुपये खर्च येतो.त्याचा परिणाम सात-आठ महिने टिकतो.'

तरुण वयातील आपल्या चेहऱ्याच्या एकूणच सौंदर्यात भर घालणारी ही *ट्रीटमेंट* फक्त तरुणच नाही, तर वयस्करही करू शकतात.

याबाबत डॉ.मोहन थॉमस म्हणाले, 'लग्न